# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** कोतवाली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0160 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 16/04/2026 22:25

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिंनाक पासून):** 16/04/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 16/04/2026
**Time From (वेळेपासून):** 16:23 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 16/04/2026 **Time (वेळ):** 22:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 044

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 16/04/2026 22:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वाहतुक निरीक्षक कक्षामध्ये ,बसस्थानक, परभणी , परभणी,परभणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** महेश मारुती पाटणकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,परभणी,परभणी, नानलपेठ,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,परभणी,परभणी, नानलपेठ,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9870313157

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | रतन नामदेव शेलार | | | 1. क्षय गोडबोले पुतळ्याचे बाजुला, जवाहर कलनी, धार रोड, परभणी,परभणी,मोधा,परभणी, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये ज्यात200/रुपये दराच्या 2 नोटा व 100/रुपये दराची 1 नोटा | 500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिंनाक 16/04/2026
मी महेश मारुती पाटणकर वय 54 वर्ष, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, परभणी मोनं. 9870313157

सरकारतर्फे फिंयादी होवुन फिंयाद देतो कि, मी दिंनाक 29/05/2025 पासुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, परभणी येथे पोलीस उप अधीक्षक म्हणुन कार्यरत आहे.

दिंनाक 15/04/2026 रोजी 17:00 वाजता आम्ही लाप्रवि कार्यालय, परभणी येथे हजर असताना तक्रारदार श्री गजानन आत्माराम गायकवाड वय 35 वर्ष रा.प. चालक 20653, परभणी आगार रा. पवनसुत नगर, परभणी लाप्रवि कार्यालय, परभणी हे हजर आले. त्यांची एका लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्याचे सांगुन लेखी तक्रार सादर केली. सदर तक्रारीचा थोडक्यात सारांश असा कि, " मला दि. 21/04/2026 रोजी मित्राच्या लग्नाला जाण्यासाठी एक दिवसाची रजा मंजूर करण्यासाठी वाहतुक निरीक्षक रतन शेलार रा.प.परभणी आगार हे मला 500 (पाचशे रुपये) लाचेची मागणी करत आहेत. रजा मंजुर करण्यासाठी पैसे देण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे वाहतुक निरीक्षक रतन शेलार हे मागत असलेले 500/-रुपये हि लाच आहे. मला त्यांना लाच द्यायची ईच्छा नाही.

दिंनाक 16/04/2026 रोजी मी वाहतुक निरीक्षक रतन शेलार यांना भेटुन रजेचा अर्ज देणार आहे. त्यावेळी त्यांनी किंवा त्यांचे वतीने इतर कोणी मला लाचेची मागणी केल्यास व स्विकारल्यास त्यांच्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही व्हावी हि विंनती.

माझा वाहतुक निरीक्षक रतन शेलार साहेबांनी या अगोदरही माझे वैद्यकीय रजेसाठी पैसे मागितले होते. ते पैसे मी न दिल्यामुळे त्यांनी मला गैरहजर दाखवुन माझा कसुरी रिपोर्ट देवुन खात्यांतर्गत चौकशी सुरु केली आहे.

माझा त्यांचा देण्या-घेण्याचा व्यवहार नाही किंवा भांडण-तंटा नाही. माझे शिक्षण 12 वी पर्यंत झालेले आहे. सदरची तक्रार स्वेच्छेने व स्वतःचे हस्ताक्षरात लिहली आहे." वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन आज दिंनाक 16/04/2026 रोजी आम्ही तालुका कृषी अधिकारी, जिंतूर, जि. परभणी यांना पत्र देवुन 1) श्री. प्रशांत आबासाहेब देवकर, उप कृषी अधिकारी व 2) श्री. सिंध्दाथ मारोतीराव कापुरे, उप कृषी अधिकारी यांना शासकीय पंच म्हणुन ला.प्र.वि. कार्यालयास 12:00 वाजता गोपनीय कामात मदत करण्यासाठी पंच म्हणुन उपलब्ध करून घेतले. त्यानंतर तक्रारदार हे 13:30 वाजता लाप्रवि कार्यालय, परभणी येथे हजर आले. आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार यांचा आपसात परिचय करुन दिला. सदर तक्रारीची खात्री करुन आम्ही व दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या.

त्यानंतर लाप्रवि, परभणी येथील कक्षात आमचे सुचनेवरुन पोशि/नागरगोजे यांनी दोन्ही पंच व तक्रारदार यांना डिव्हीआर बाबत माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक कुठे भेटतील याबाबत विचारपुस केली. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक हे कार्यालयात भेटतील असे सांगितले. त्यामुळे सर्वानुमते लोकसेवक शेलार यांचेवर पडताळणी कार्यवाहीसाठी ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 देवकर यांना तक्रारदार यांचेकडे असलेल्या चारचाकी क्रमांक एमएच 12 जेझेड 3471 ने लोकसेवक शेलार यांचेकडे पडताळणी करीता पाठविण्यात आले. सदरची पडताळणी कार्यवाही 14:11 ते 15:09 दरम्यान करण्यात आली. सदर पडताळणी दरम्यान

तक्रारदार यांची लोकसेवक शेलार यांचेशी भेट झाली. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक शेलार यांचेशी रजेसंदर्भात चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक शेलार यांनी "पाचशे दे चल बाबा... दे पाचशे दे..." असे बोलुन तक्रारदार यांना 500/-रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी अर्ज तरी घ्या, काही वेळाने आणुन देतो असे सांगितले. त्यावर लोकसेवक शेलार यांनी 500/-रुपये आणण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 देवकर हे लाप्रवि कार्यालय, परभणी येथे परत आले.

लोकसेवक शेलार यांनी 500/-रुपये लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष निष्पन्न झाले. त्यामुळे तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष 200/-रुपये दराच्या 2 नोटा व 100/-रुपये दराची 1 नोट अशा एकुण 3 नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर्स पंच क्र 2 कापुरे यांनी त्यांचे हस्ताक्षरात एका को-या कागदावर लिहले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोना/संतोष बेद्रे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचांना अल्ट्राव्हायलेट लॅम्प व अॅंथ्रासिन पावडर बाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर पोना/संतोष बेद्रे यांनी तक्रारदार यांनी जमा केलेल्या 200/-रुपये दराच्या 2 नोटा व 100/-रुपये दराची 1 नोटास अॅंथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे शर्टचे डावे बाजुच्या खिशात ठेवल्या. त्यानंतर दोन्ही पंच, तक्रारदार व सापळा पथकास सापळा कार्यवाही अनुषंगाने सुचना देण्यात आल्या. तसेच लोकसेवकाने लाचरक्कम स्विकारल्यास त्याबाबतचा पुर्व नियोजीत इशारा बाबत सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक कुठे भेटतील याबाबत विचारपुस केली. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक शेलार हे परभणी आगारात भेटतील असे सांगितले. त्यामुळे सर्वानुमते लोकसेवक शेलार यांचेवर परभणी आगारात सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 देवकर यांना पंच क्र 1 देवकर यांचेकडील मोटारसायकल क्रमांक एमएच 22 एल 5445 ने लोकसेवक शेलार यांचेकडे सापळा कार्यवाही करीता पाठविण्यात आले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र 2 कापुरे, सापळा पथक असे मोटारसायकल व स्कुटीने तक्रारदार यांचे पाठोपाठ गेलो. तक्रारदार यांनी मोटारसायकल हि बसस्थानक परभणीचे परिसरात लावली. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 देवकर हे बसस्थानकच्या आत गेले. तेथील वाहतुक निरीक्षक कक्ष नावाची पाटी असलेल्या कॅबीनमध्ये तक्रारदार उघडया दरवाज्यातुन आत गेले. त्यावेळी पंच क्र 1 हे तक्रारदार यांचेवर लक्ष ठेवत दरवाजा समोर थांबले. त्यामुळे सापळा पथक सदर कक्षाचे आजुबाजूस थांबले. काही वेळातच तक्रारदार यांनी कक्षाचे बाहेर येवुन त्यांचेकडील हातरुमाल काढुन तोंडास पुसून लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यामुळे आम्ही व सापळा पथकाने लोकसेवक शेलार यांना लाचरकमेसह ताब्यात घेतले. सदरची सापळा कार्यवाही हि 16ः23 ते 16ः34 वा दरम्यान करण्यात आली.

आज दिंनाक 16/04/2026 रोजी 14ः11 ते 15ः09 वा करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक शेलार यांनी पंचासमक्ष तक्रारदार गजानन गायकवाड यांना रजा मंजुर करण्यासाठी 500/-रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर आज दिंनाक 16/04/2026 रोजी 16ः23 ते 16ः34 वा करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान बसस्थानक, परभणी येथील वाहतुक निरीक्षक कक्षामध्ये लोकसेवक शेलार यांनी पंचासमक्ष तक्रारदार गजानन गायकवाड यांचेकडुन 500/-रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे.

म्हणुन माझी आरोपी लोकसेवक रतन नामदेव शेलार वय 47 वर्ष पद-वाहतुक निरीक्षक, राज्य परिवहन महामंडळ, परभणी रा. अक्षय गोडबोले पुतळयाचे बाजुला जवाहर कॉलनी, धार रोड, परभणी गट-क यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिंयाद आहे.

फिंयाद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

VISHWAJEET GANGADHAR KASLE(I (Inspector)) / POBN84374 **or (**किंवा**)**

**(2) Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

**(3) Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

**(4) Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन कोतवाली, परभणी

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** VISHWAJEET GANGA

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):** POBN84374